शब्दांना सत्याची धार

# प्रहार

मुंबई ● शुक्रवार, २९ मे २०२६

मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध ● वर्ष २२ ● अंक २३० ● पाने १० ● ₹ ५.००

www.prahaar.in epaper.prahaar.in



यापुढे निवासी दाखला मिळाल्यावरच घरांचा ताबा

पान : मुंबई



नव्या युगाची चाहूल...!

पान : क्रीडा

## सिद्धरामय्या यांचा मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा

### डी. के. शिवकुमार कर्नाटकचे नवे कारभारी

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :



कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी गुरुवारी आपल्या पदाचा राजीनामा राज्यपाल थावरचंद गेहलोत यांच्या सचिवांकडे सुपूर्द केला. मुख्यमंत्री म्हणून दुसऱ्या कार्यकाळातील तीन वर्षे पूर्ण होताच काँग्रेस हायकमांडने त्यांना पद सोडण्याचे निर्देश दिल्याची माहिती समोर आली आहे.

राजीनाम्यापूर्वी सिद्धरामय्या यांनी आपल्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांसोबत ब्रेकफास्ट बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देत असल्याची माहिती दिली आणि पुढील मुख्यमंत्री म्हणून डी. के. शिवकुमार सूत्रे हाती घेतील, असे स्पष्ट केले. राज्यपाल थावरचंद गेहलोत हे इंदूर येथे असल्याने सिद्धरामय्या यांनी 'लोक भवन' येथे राज्यपालांच्या सचिवांकडे राजीनामा सुपूर्द केला. मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा सादर करताना त्यांच्यासोबत उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार उपस्थित होते.

मे २०२३ मध्ये काँग्रेस सत्तेत आल्यानंतर सिद्धरामय्या आणि डी. के. शिवकुमार यांच्यात सत्ता-वाटपाचा करार झाल्याची चर्चा होती. या करारानुसार ठरावीक कालावधीनंतर मुख्यमंत्रीपदाची सूत्रे शिवकुमार यांच्याकडे देण्याचे आश्वासन दिल्याचे सांगितले जाते. या चर्चेत राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांचीदेखील महत्त्वाची भूमिका होती. तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर डी. के. शिवकुमार यांनी सत्ता हस्तांतरणासाठी जोरदार आग्रह धरल्याने काँग्रेस हायकमांडने अखेर निर्णय घेतल्याचे सूत्रांनी सांगितले.

#### राज्यसभा नाकारली, कर्नाटकच्या राजकारणातच राहणार

■ मी सक्रिय राजकारणातच कार्यरत राहीन. मला राज्यसभेबद्दलही विचारणा करण्यात आली होती; पण मी ती नाकारली आहे. मला कर्नाटकच्या राजकारणातच राहायचे आहे, असे मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर सिद्धरामय्यांनी स्पष्ट केले. बंगळूरु येथील लोकभवन येथे राजीनामा सुपूर्द केल्यानंतर पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

■ काँग्रेस पक्षाची आश्वासने पूर्ण करून आपण 'दिलेला शब्द पाळला' असे सांगत मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर ते म्हणाले की, विरोधकांकडून होणाऱ्या टीकेला तोंड देत सरकारने बहुतांश आश्वासनांची पूर्तता केली आहे. २०१८ मध्ये केलेल्या १६२ आश्वासनांपैकी १५८ आश्वासनांची अंमलबजावणी करण्यात आली. २०२३ च्या विधानसभा निवडणुकांचा उल्लेख करत त्यांनी स्पष्ट केले की, काँग्रेसने दिलेल्या ५५० आश्वासनांपैकी सुमारे ३०० आश्वासने आधीच पूर्ण केली आहेत. सरकारने पहिल्याच वर्षी आपल्या पाचही प्रमुख 'गॅरंटी' योजना लागू केल्या, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

## लष्कराच्या हाती 'नीट' सूत्रे

### प्रश्नपत्रिका पोहोचवण्याची जबाबदारी वायुदलावर

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

देशभरात सातत्याने गाजत असलेल्या वैद्यकीय प्रवेशासाठीच्या 'नीट' परीक्षेतील घोटाळे आणि पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार आता ॲक्शन मोडमध्ये आले आहे. आगामी २१ जून रोजी होणारी नीटची फेरपरीक्षा अत्यंत पारदर्शक, सुरक्षित व योग्य रीतीने पार पाडण्यासाठी सरकारने थेट भारतीय लष्कराची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. इतकेच नव्हे, तर देशातील सर्व परीक्षा केंद्रांवर गोपनीय पेपर्स सुरक्षितपणे पोहोचवण्यासाठी भारतीय वायुदलाची मदत घेतली जाणार आहे. प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी ही माहिती दिली.

नीटच्या फेरपरीक्षेच्या नियोजनासंदर्भात गुरुवारी देशाची राजधानी दिल्लीमध्ये एक अत्यंत उच्चस्तरीय बैठक पार पडली. केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अधिकृत निवासस्थानी ही बैठक पार पडली. या बैठकीला केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया, एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंह, सीबीएसईचे वरिष्ठ अधिकारी आणि पंतप्रधान कार्यालयातील काही वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत २१ जून रोजी होणाऱ्या फेरपरीक्षेच्या संपूर्ण सुरक्षा व्यवस्थेवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीनंतर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी प्रसिद्धी माध्यमांशी संवाद साधताना या ऐतिहासिक निर्णयाची घोषणा केली.

परीक्षेतील वाढते गैरप्रकार रोखण्यासाठी आणि देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचा तसेच पालकांचा विश्वास पुन्हा निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारने कंबर कसली आहे. या बैठकीत नीट परीक्षा अधिक पारदर्शक आणि 'फुलप्रूफ' करण्याबाबत विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली.

परीक्षा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर तांत्रिक सुधारणा केल्या जाणार असून, संवेदनशील परीक्षा केंद्रांवर कडक पहारा ठेवण्यात येणार आहे. पेपर लीकचा कोणताही मार्ग उरणार नाही, अशा प्रकारे तांत्रिक आणि मानवी सुरक्षा यंत्रणा तैनात केली जाईल. पेपर वाहतुकी दरम्यान होणारे गैरप्रकार टाळण्यासाठीच वायुदलाच्या विशेष विमानांची मदत घेतली जाणार आहे.

नीट परीक्षेतील गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर देशभरातून मोदी सरकारवर जोरदार टीका झाली होती. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ होत असल्याच्या तक्रारींनंतर आता खुद्द गृह आणि संरक्षण यंत्रणा या परीक्षेत लक्ष घालत आहेत. लष्कर आणि वायुदलाच्या थेट सहभागामुळे परीक्षा केंद्रांवर पेपर पोहोचण्यापासून ते परीक्षा संपेपर्यंत कडेकोट बंदोबस्त असणार आहे. आता २१ जूनच्या फेरपरीक्षेत कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी यंत्रणा दिवस-रात्र काम करत आहेत.




#### पेपरफुटीनंतर १२ मे रोजीची परीक्षा रद्द

नीटची परीक्षा ३ मे रोजी भारतातील ५५१ आणि परदेशातील १४ शहरांमध्ये झाली होती, ज्यात २२ लाखांहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. पेपरफुटीनंतर १२ मे रोजी ती रद्द करण्यात आली.

#### बँक डिटेल्स न दिलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा

एनटीएकडून नीट यूजी २०२६ परीक्षेसाठी घेण्यात आलेले शुल्क परत केले जात आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या बँक खात्याची माहिती सादर करण्यास सांगितले आहे. आतापर्यंत १३ लाख विद्यार्थ्यांनी बँक खात्याची माहिती दिली असून, ज्या विद्यार्थ्यांनी माहिती दिली नाही. त्यांच्यासाठी अंतिम मुदत वाढवली आहे. विद्यार्थी आता अधिकृत रजिस्ट्रेशन पोर्टलवर २२ जून २०२६ रोजी रात्री ११.५० पर्यंत त्यांची माहिती भरू शकणार आहेत.

## अकरावी प्रवेशाची आज पहिली गुणवत्ता यादी !

### विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर येणार संदेश

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

इयत्ता अकरावी प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी शुक्रवारी (दि. २९ मे) सकाळी ११ वाजता प्रसिद्ध होणार आहे. पोर्टलवर कनिष्ठ महाविद्यालय वाटपाची यादी आणि गुणवत्ता यादीनुसार कनिष्ठ महाविद्यालयांच्या नावांसमोर प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे असणार आहेत. प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर मेसेज पाठविले जाणार आहेत. विद्यार्थ्यांना ३ जूनपर्यंत प्रवेश घ्यायचे आहेत. अकरावी प्रवेशासाठी राज्यातील साडेबारा लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे, पण त्यातील साडेसोळा हजार विद्यार्थ्यांनी लिंगाची (स्त्री, पुरुष) नोंदच केलेली नाही.

अकरावी प्रवेश फेरीच्या पहिल्या गुणवत्ता यादीचा 'कट ऑफ' अधिकच असणार आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना पहिल्या यादीत प्रवेश मिळालेला नाही, त्यांना अर्जात भरलेला महाविद्यालयांचा पसंतीक्रम बदलता येणार आहे. तत्पूर्वी, पहिल्या गुणवत्ता यादीनुसार ज्या विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशासाठी कॉलेज मिळाले आहे, त्याठिकाणी प्रवेश घ्यायचा असल्यास अर्जात 'प्रोसिड फॉर ॲडमिशन'वर क्लिक करावे. त्यानंतर कागदपत्रे पडताळणीसाठी त्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे व प्रवेश निश्चित करावा. याशिवाय ज्या विद्यार्थ्यांना मिळालेल्या महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा नसल्यास त्यांनी त्यास नकार कळवायचा आहे.

कोटा (व्यवस्थापन, संस्थाअंतर्गत व अल्पसंख्याक कोटा) प्रवेशाचीही पहिली यादी शुक्रवारीच (ता. २९) प्रसिद्ध होणार आहे. अकरावीसाठी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन राहिलेल्या जागा दुसऱ्या प्रवेश फेरीपूर्वी महाविद्यालयांना प्रसिद्ध कराव्या लागणार आहेत. त्यानुसार ॲडमिशनसाठी विद्यार्थ्यांना त्यांचा पसंतीचा अभ्यासक्रम निवडता येणार आहे

#### १२ लाख ५१ हजार विद्यार्थ्यांची नोंदणी

#### प्रत्येक फेरीपूर्वी नावनोंदणीची संधी




#### १ जुलै किंवा १५ जुलैला सुरू होणार अकरावीचे वर्ग

अकरावी प्रवेशाची दुसरी प्रवेश फेरी ५ जूननंतर प्रसिद्ध होईल. त्यानंतर काही दिवसांच्या अंतराने उर्वरित तीन प्रवेश फेऱ्या देखील याद्या जाहीर होतील. त्यानंतर १ जुलै किंवा १५ जुलैपासून अकरावीचे वर्ग सुरू होतील, यादृष्टीने माध्यमिक शिक्षण विभागाने नियोजन केले आहे. अकरावी प्रवेशाच्या एकूण पाच फेऱ्या होणार असून शेवटची फेरी मुलींसाठी विशेष असणार आहे. प्रत्येक प्रवेश फेरीपूर्वी ज्या विद्यार्थ्यांनी अकरावी प्रवेशासाठी नोंदणी केलेली नाही, त्यांना https://mahafyjcadmissions.in या संकेतस्थळावर नोंदणी करता येणार आहे. प्रवेश फेऱ्या पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांची नोंदणी सुरूच राहील, अशी माहिती माध्यमिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिली.

## कोयनेतला जलसाठा खालावल्याने वीजनिर्मिती संकटात!

◆ चिपळूण (प्रतिनिधी):

कोयना धरणातील पाणीपातळी खालावल्याने धरणातील पाणीसाठा १२.०४ टीएमसीवर आला आहे. वीजनिर्मिती करणाऱ्या 'महाजनको'चा शिल्लक कोटाही दोन दिवस पुरेल इतकाच केवळ ०.५८ टीएमसी असल्याने १ जूननंतर महाजनकोला वीजनिर्मिती बंद करावी लागण्याची भीती आहे. यामुळे वीजनिर्मितीसह सिंचनांचे संकट ओढवण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

> कोयना धरणात सध्या पुरेसा पाणीसाठा नसल्याने वीजनिर्मिती आणि सिंचन यावर परिणाम होणार आहे. पश्चिमेकडील वीज निर्मितीसाठीचा कोटा दोन दिवसांत संपणार असून, त्यानंतर वीजनिर्मिती थांबवावी लागेल. 'महाजनको'ने सचिव स्तरावर शासनाकडे वीजनिर्मितीसाठी पाण्याची मागणी केली आहे.
>
> **- अभय काटकर**, अधीक्षक अभियंता, सिंचन मंडळ, सातारा

पूर्वेकडील सिंचनासाठी लागणारे २.५० टीएमसी पाणी शिल्लक आहे. वळवाच्या पावसाने हुलकावणी दिल्याने पाण्याचे संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे धरणातील पाणी पातळी खालावल्याने टप्प्याटप्प्याने कोयना धरणातून निर्माण होणारी वीज बंद केली जाणार आहे.

## त्रिभाषा धोरणावर 'सर्वोच्च' संताप!

### केंद्र सरकार आणि सीबीएसई मंडळाला कारणे दाखवा नोटीस

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

देशातील सर्वोच्च न्यायालयाने सीबीएसईच्या नवीन त्रिभाषा धोरणावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत इयत्ता नववी आणि दहावीमध्ये तीन भाषा अनिवार्य करण्याच्या निर्णयाला आव्हान देणारी जनहित याचिका न्यायालयाने गांभीर्याने स्वीकारली आहे. या प्रकरणात केंद्र सरकार आणि सीबीएसई मंडळाला 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली आहे.

सीबीएसई आणि केंद्र सरकारला चार आठवड्यांच्या आत सविस्तर उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. सीबीएसईने घेतलेल्या नवीन त्रिभाषा नियमानुसार, नववीपासून विद्यार्थ्यांना आर १, आर२ आणि आर ३ अशा तीन भाषांचा अभ्यास अनिवार्य करण्यात आला आहे.

#### चार आठवड्यांच्या आत मागितले उत्तर

#### निर्णयामुळे संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

#### न्यायालयाची जबाबदारी

सर्वोच्च न्यायालयाने या संवेदनशील मुद्द्यावर त्वरित दखल घेतल्याने शिक्षण क्षेत्रात चर्चेला उधाण आले आहे. न्यायालयाने धोरणाच्या अंमलबजावणीच्या प्रक्रिया, विद्यार्थ्यांवर होणारे परिणाम आणि त्याची आवश्यकता याबाबत सविस्तर विचार करणे अपेक्षित आहे. सीबीएसईचे अधिकारी सध्या या प्रकरणामुळे गोंधळलेले दिसत आहेत. न्यायालयाने कडक भूमिका घेतल्यामुळे विद्यार्थी चळवळीत समाधान व्यक्त केले जात आहे. कोणतेही धोरण राबविण्यापूर्वी अथवा अंमलबजावणी करण्यापूर्वी साधकबाधक चर्चा त्यावर होणे आवश्यक असल्याचे विद्यार्थी घटकांकडून सांगण्यात येत आहे.

#### मनमानी आणि अभावित सल्लामसलत

याचिकेत सीबीएसईच्या निर्णयाला 'मनमानी, हुकूमशाही आणि जाचक' असे संबोधण्यात आले आहे. विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांसारख्या मुख्य हितधारकांशी कोणतीही सल्लामसलत न करता, मंडळाने रातोरात हा बदल केल्याचा आरोप करण्यात आला आहे. वातानुकूलित खोल्यांमध्ये बसून घेतलेल्या या निर्णयामुळे संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## पहिली 'वॉटर मेट्रो' मुंबईत दाखल

### मंत्री नितेश राणे यांनी दिली खुशखबर

### 'कॅन्डेला पी-१२' बोटीच्या चाचण्यांना जूनमध्ये सुरुवात

◆ मुंबई (प्रतिनिधी):

मुंबईकरांचा प्रवास वेगवान व पर्यावरणपूरक करण्यासाठी 'मुंबई वॉटर मेट्रो' आता प्रत्यक्ष रूपात अवतरणार आहे. या वॉटर मेट्रोच्या ताफ्यातील पहिली अत्याधुनिक स्वीडिश इलेक्ट्रिक बोट मुंबई बंदरात दाखल झाली असून, जूनच्या पहिल्या आठवड्यापासून तिच्या मार्गिका चाचण्यांना सुरुवात होणार आहे. मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी ही खुशखबर दिली.



महाराष्ट्राला लाभलेल्या ८७७ किलोमीटर लांबीच्या विस्तीर्ण किनारपट्टीचा वापर करून राज्यातील जलवाहतूक अधिक सक्षम करण्यासाठी राज्य सरकारकडून पावले उचलली जात आहेत. मुंबईच्या रस्त्यांवरील वाहतूक कोंडी, खड्डे आणि वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी वॉटर मेट्रो हा एक उत्तम पर्याय ठरणार आहे.

वॉटर मेट्रोच्या ताफ्यात दाखल झालेली 'कॅन्डेला पी-१२' ही बोट स्वीडनहून मागवण्यात आली असून ती इलेक्ट्रिक प्रपल्शन व हायड्रोफॉइल तंत्रज्ञानावर आधारित आहे. ही बोट सुमारे ४६ किमी प्रति तास या वेगाने धावणार असून, या बोटीची प्रवासी क्षमता ३० आहे.

#### पारंपरिक बोटींची जागा आता हायटेक बोटी घेणार

- किनारी भागातील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे बदलण्यासाठी सरकार जागतिक पातळीवरील आघाडीच्या कंपन्यांशी चर्चा करत आहे. या पहिल्या ३० आसनी बोटीच्या यशस्वी चाचणीनंतर, ५० आणि १०० प्रवासी क्षमता असलेल्या आधुनिक बोटी आणण्यासाठी नॉर्वेमधील कंपन्यांशीही बोलणी सुरू असल्याची माहिती मंत्री नितेश राणे यांनी दिली.
- या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे आगामी काळात गेट वे ऑफ इंडिया परिसरासह मुंबईच्या किनारपट्टीवर दिसणाऱ्या पारंपरिक लाकडी बोटींच्या जागी अत्याधुनिक, हायटेक आणि पर्यावरणपूरक विद्युत बोटींचे एक नवे आणि देखणे चित्र पाहायला मिळणार आहे. या जलवाहतुकीमुळे प्रवाशांचा प्रवासाचा वेळ तर वाचेलच, शिवाय मुंबईकरांना सुखकर आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचा प्रवासाचा अनुभवही मिळणार आहे.

#### 'कॅन्डेला पी-१२' बोटीची वैशिष्ट्ये

अत्याधुनिक हायड्रोफॉइल तंत्रज्ञानामुळे ही बोट चालताना पाण्याचा कमीत कमी रोध होतो. परिणामी, ती पाण्याच्या पृष्ठभागावरून तरंगत उडत असल्याचा आभास होतो. ही बोट इतर पारंपरिक डिझेल फेऱ्यांच्या तुलनेत ८० टक्के कमी ऊर्जा वापरते. शून्य कार्बन उत्सर्जन करणारी ही नौका पूर्णपणे प्रदूषणमुक्त आणि आवाजरहित आहे. त्यामुळे समुद्री पर्यावरणाला कोणतीही हानी पोहोचणार नाही.

## नसरापूर अत्याचार प्रकरणी आजपासून इन-कॅमेरा सुनावणी

◆ पुणे (प्रतिनिधी) :

नसरापूर येथील तीन वर्षीय चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिचा खून केल्याप्रकरणातील आरोपी भीमराव कांबळे हा मानसिकदृष्ट्या सक्षम असल्याचे स्पष्ट झाले असून, त्याबाबतचा वैद्यकीय अहवाल गुरुवारी विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयात सादर करण्यात आला. आरोपीविरोधात लावण्यात आलेल्या कलमांनुसार गुन्हा सिद्ध करण्यासाठी तोंडी व कागदोपत्री पुरावा सरकारी पक्षाकडे आहे. त्यामुळे, आरोपीविरुद्ध दोषारोप निश्चित करण्याची मागणी विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी केली. न्यायालयाने दोषारोप निश्चित करत नियमित सुनावणी इन-कॅमेरा घेण्याचे आदेश दिले.

या प्रकरणातील आरोपी भीमराव कांबळे याला गुरुवारी सकाळी अकराच्या सुमारास विशेष न्यायालयात हजर करण्यात आले.

## पुन्हा युद्ध पेटले!

### इराणचा अमेरिकेच्या एअरबेसवर जबरदस्त हल्ला

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता चर्चा फिसकटल्याचे दिसून येत आहे. त्यातच इराणच्या आयआरजीसीने अब्बास पोर्टवरील अमेरिकेच्या हल्ल्याचा बदला घेतल्याचा दावा केला आहे. त्यांनी अमेरिकेच्या एअरबेसवर हल्ला केल्याचा दावा केला असून तिकडे कुवैतचे संरक्षणमंत्र्यांनी त्यांच्या देशाच्या दिशेने डागलेल्या मिसाईल्स आणि डोन्सना थोपवण्यात आल्याचे सांगितले.

इराणच्या आयआरजीसीने गुरुवारी सांगितले की, स्थानिक वेळेनुसार सकाळी ४.५० ला अब्बास पोर्टजवळ हा हल्ला करण्यात आला. एका अमेरिकी एअरबेसला टार्गेट करण्यात आले असल्याचा दावा आयआरजीसीने केला आहे.

इराणच्या आयआरजीसीने अमेरिकेला स्पष्ट शब्दांत प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला आहे.

त्यांनी जर या प्रकारचा हल्ला पुन्हा झाला, तर इराणकडून यापेक्षाही भीषण आणि निर्णायक प्रतिक्रिया देण्यात येईल.

#### ट्रम्प यांची ट्रुथ सोशलवरील पोस्ट

ट्रम्प यांनी इराणचे नौदल उद्ध्वस्त झाल्याचा दावा केला आहे. काही माध्यमं इराणचे नौदल मजबूत असल्याचा दावा करत आहेत. यावरूनच ट्रम्प यांनी इराणी नौदल महासागराच्या तळाशी आहे, असे पोस्ट ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर केली.

#### इराणने केली बोचरी टीका

'ओबामा इराणीचे शत्रू होते. पण, ट्रम्प यांच्यापेक्षा बराक सुशिक्षित होते. त्यांना समुद्र व 'महासागरातील फरक कळत होता', अशी खोचक टीका इराणी दूतावासाने केली आहे.

#### अमेरिकेचा इराणवर हवाई हल्ला

बुधवारी रात्री अमेरिकेने इराणच्या हद्दीत हवाई हल्ला केला. रात्री १.३० वाजता इराणचे बंदर अब्बास शहराच्या पूर्व भागात तीन स्फोटांचे आवाज ऐकू आले. अमेरिकेच्या लष्कराने रात्री इराणमध्ये नव्याने हल्ले केले आहेत. स्ट्रेट ऑफ होर्मुझमध्ये अमेरिकी लष्कर व व्यावसायिक समुद्री वाहतुकीला धोका पोहोचवत असलेल्या जहाजावर कारवाई करण्यात आली.

## वेचक

### मोनोरेल पुन्हा ट्रॅकवर येणार

**मुंबई :** गेल्या आठ महिन्यांपासून बंद पडलेली संत गाडगे महाराज चौक ते चेंबूर मोनोरेल पुन्हा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मोनोरेल मार्गिका सुरू करण्यासाठी अंतिम सुरक्षा तपासणी निवृत्त सीएमआरएस यांनी पूर्ण केली आहे. त्यामुळे त्यांच्याकडून मोनो सुरू करण्यासाठी हिरवा कंदील मिळताच मोनो पुन्हा ट्रॅकवर येणार आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत हे अंतिम प्रमाणपत्र मिळताच मोनो पुन्हा प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे. मोनो मार्गिका २० किमी लांबीची असून त्यावर १७ स्थानके आहेत. मोनोरेल मार्गावरील यंत्रणा खराब झाल्याने त्यामध्ये बिघाड होत होते. त्यातून मोनो सेवा २० सप्टेंबर २०२५ पासून अनिश्चित काळासाठी बंद करण्यात आली होती.

### शायर बशीर बद्र यांचे निधन

**मुंबई :** मशहूर उर्दू शायर बशीर बद्र यांनी ९१ वर्षांच्या वयात अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच लाखो चाहत्यांच्या मनात दुःखाची लहर पसरली आहे. आधुनिक गझलेचे उस्ताद म्हणून ओळखले जाणारे बशीर बद्र यांना साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. बशीर बद्र यांचा जन्म १५ फेब्रुवारी १९३५ रोजी उत्तर प्रदेशातील अयोध्या येथे झाला. पारंपरिक उर्दू शायरीत सामान्यतः न येणारे शब्द त्यांनी गझलेत कुशलतेने वापरले आणि नवीन शब्दांची भर घातली. १९८७ मध्ये मेरठमध्ये झालेल्या सांप्रदायिक दंग्यांमध्ये बद्र यांचे घर जाळण्यात आले.

## सुट्टीवर गेलेले चालक न परतल्याने बंदरातील वाहतूक कोलमडली

### 'जेएनपीए'त ६२ हजार कंटेनर पडून

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

मागील काही दिवसांपूर्वी पाच राज्यातील झालेल्या निवडणुका आणि उन्हाळ्याची सुट्टी यामुळे आपल्या राज्यात सुट्टीवर गेलेले सुमारे साडेचार हजार टीटी वाहनचालक अद्यापही परतलेच नाही. त्यामुळे जेएनपीए बंदरातील कंटेनर वाहतूक यंत्रणा पूर्णपणे कोलमडली आहे.

जेएनपीए बंदरात सुमारे ६२ हजार कंटेनर अडकून पडले आहेत. त्यातच इंधन वाढीविरोधात वाहतूकदारांच्या संपामुळे या प्रक्रियेत आणखी भर पडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

उरण भागातील जेएनपीएने कंटेनरची वेळेवर हाताळणी आणि वाहतूक करण्यासाठी परराज्यात निवडणुका आणि मे महिन्याच्या सुट्टीसाठी गेलेल्या टीटी वाहनचालकांना लवकरात-लवकर बंदरात आणण्यासाठी रेल्वे गाड्या बुकिंग करण्याच्या हालचाली सुरू केल्या. त्यासाठी ५० लाखांहून अधिक निधीच्या खर्चाची तरतूद करण्यात आल्याची माहिती मागील आठवड्यात जेएनपीए अधिकाऱ्यांनी दिली होती. मात्र आजपर्यंत यासाठी कोणत्याही प्रकारच्या निधीची तरतूद झालेली नसल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे गेलेले वाहनचालक येणार कसे? असा प्रश्न निर्माण निर्माण झाला आहे.



#### धिम्या गतीने बंदरातील कंटेनर हाताळणी

संबंधित परिस्थितीमुळे आयात - निर्यातदार अक्षरशः हैराण झाले आहेत. २ ते ३ दिवसांत हाताळणी होणाऱ्या कामाला सुमारे १५ दिवस लागत असल्याने त्याचा चार्ज आयातदारांवर पडत आहे. त्यांना वेळेत कंटेनरची हाताळणी करता येत नसल्याने आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. यात ६२ हजार अडकलेल्या कंटेनरमध्ये देश-विदेशातून वृतपत्र छपाईसाठी मागविण्यात येणाऱ्या विविध वृत्तपत्रांच्या कागदी रोलचे कंटेनरही मोठ्या प्रमाणात अडकून पडले आहेत. जेएनपीए बंदरातील कंटेनर हाताळणी योग्य रितीने आणि वेळेत व्हावी, यासाठी परराज्यातील टीटी वाहनचालकांना बंदरात आणण्यासाठी ५० लाखांच्या निधीची तरतूद केल्याची माहिती जेएनपीए अधिकाऱ्यांनी दिली होती. प्रत्यक्षात ही फसवी योजना असून, कोणतीही आर्थिक तरतूद झालेली नसून, परराज्यातील वाहनचालक आजतगायत परतलेच नाहीत. त्यामुळे कंटेनर हाताळणी धिम्या गतीने चालत आहे, असे आयातदार टायटॅनिक ओशियन सर्व्हिसेस लिचे ऑपरेशन मॅनेजर कैलास आवटे यांनी सांगितले.

#### दोन महिन्यांपासून चालकांचा तुटवडा

मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थिती निवळताच जेएनपीएचे कंटेनर हाताळणीचे काम पूर्व पदावर येण्यास सुरुवात झाली होती. मात्र देशातील पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, केरळ, आसाम व पॉन्डीचेरी या पाच राज्यांच्या निवडणुकीसाठी जेएनपीए बंदर व बंदर परिसरातील विविध शेकडो कंटेनर यार्डमध्ये काम करणारे साडेचार हजार टीटी वाहनचालक सुट्टीवर गेले आहेत. हजारो टीटी वाहनचालक हे महिनाभराची सुट्टी कुटुंबीयांसोबत घालवण्यासाठी त्यांच्या राज्यातील गावाकडे गेले आहेत. मात्र दोन महिन्यांपासून परगावी गेलेले वाहनचालक परतलेच नाहीत. वाहनचालक तुटवड्यामुळे हजारो कंटेनर बंदराबाहेरील सीएफएसपर्यंत पोहोचवण्यासाठी व सीएफएसमधून बंदरात आणण्यासाठी मोठी समस्या निर्माण होत आहे.